**प्रेस नोट** दिनांक ३१/०८/२०१९

**श्री. विजय व्यंकटराव भोसले, तत्कालीन तलाठी सजा पळशी ता.खंडाळा महसुल खाते, वर्ग ३ यांना लाच स्विकारले प्रकरणी शिक्षा**

---

दिनांक १९/०४/२०१४ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तक्रारदार यांचे पळशी शेतजमीन गट नं २०५० मधील बोजा कमी करुन ७/१२ उतारा व कोर्ट कामकाजासाठी फेरफार उतारा क्रमांक २३७६ देण्यासाठी पंचासमक्ष २०००/- रुपये लाच रक्कम मागणी करुन स्विकारताना श्री. विजय व्यंकटराव भोसले, तत्कालीन तलाठी सजा पळशी ता.खंडाळा जि. सातारा यांना रंगेहात पकडण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने त्यांचे विरुध्द खंडाळा पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. ०९/२०१४ लाचलुचपत प्रतिबंधक अधि.१९८८ चे कलम ७, १३, (१) (ड) सह १३ (२) अन्वये दिनांक २०/०४/२०१४ रोजी दाखल करण्यात आलेला होता. प्रस्तुत गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस उपअधीक्षक श्रीहरी पाटील, ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा यांनी करुन गुन्हयाचे दोषारोपपत्र मा. विशेष न्यायालय सातारा येथे दिनांक २६/०२/२०१४ रोजी दाखल केले होते. त्याचा स्पेशल केस नं १७/२०१४ असा होता.

दिनांक ३१/०८/२०१९ रोजी मा. श्री. एन एल मोरे, विशेष न्यायाधीश, विशेष न्यायालय सातारा यांनी प्रस्तुत खटल्यामध्ये न्यायनिर्णय देवुन त्यामध्ये श्री. विजय व्यंकटराव भोसले, तत्कालीन तलाठी सजा पळशी ता.खंडाळा यांना लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये दोषी ठरवून ४ वर्षे सक्त मजुरी व ५०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने साधी कैद तसेच कलम १३ (१)(ड) १३ (२) अन्वये ४ वर्षे सक्त मजुरी व ५०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर केसमध्ये सहायक सरकारी वकील श्री. लक्ष्मणराव खाडे यांनी सरकारतर्फे कामकाज चालविले. याकामी श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. तसेच सदर गुन्हयाचे न्यायालयीन कामकाजात पैरवि अधिकारी श्री. अशोक शिर्के, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि. सातारा, पोलीस हवालदार श्री. विजय काटवटे, पोकॉ. निलेश येवले यांनी मदत केली.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग, सि.स.नं ५२४/अ, जिल्हा कोषागार कार्यालयाचे पाठीमागे, सदरबझार सातारा येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२१६२/२३८१३९ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

website :- acbmaharashtra.gov.in
Mobile App – www.acbmaharashtra.net
Facebook Page – www.facebook.com/MaharashtraACB